सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ३ जून २०२६

आतील पानावर

पान २– सलमानचे हॉलीवूडमध्ये पदार्पण
पान ३– समंथाचा 'या' सिनेमात दमदार अवतार
पान ४– प्रिती झिंटाचं दमदार कमबॅक!
पान ५– जवळचा माणूस जपता आला पाहिजे!
पान ७– सोनालीने सांगितला बॉलीवूडमधील संघर्ष




# 'मर्दिनी'तील प्रार्थनाच्या रौद्र रूपाने प्रेक्षक थक्क

गेल्या काही दिवसांपूर्वी लोकप्रिय अभिनेत्री प्रार्थना बेहेरेच्या मर्दिनी चित्रपटाचे पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. यानंतर आता या चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.

मर्दिनीचा अंगावर काटा आणणारा टीझर रिलीज करण्यात आला असून, प्रार्थना बेहेरेच्या पात्राची झलक दाखवण्यात आली आहे. जी चित्रपटाविषयी मोठी उत्सुकता निर्माण करते. अभिनेत्री एका वेगळ्याच भूमिकेत पाहायला मिळत आहे. या टीझरमध्ये आपल्या लेकरावर संकट आल्यानंतर एक सामान्य आई रौद्र रूप कसं धारण करते, याची अस्वस्थ करणारी झलक पाहायला मिळते. प्रार्थनाने मर्दिनी चित्रपटाचे पोस्टर शेअर करत सोशल मीडियावर पोस्ट लिहित घोषणा केली होती. आता मर्दिनीची झलक पाहून प्रेक्षक भारावून गेले आहेत.

अभिनेत्री प्रार्थना बेहेरे हिने छोट्या पडद्यावरुन मोठ्या पडद्यावर एन्ट्री घेतली. तिच्या कॉफी आणि बरंच काही चित्रपटाने मोठी लोकप्रसिद्धी तिला मिळवून दिली. या चित्रपटानंतर तिने अनेक चित्रपटांमध्ये महत्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. या टीझरमध्ये अभिजीत खांडकेकर आणि जितेंद्र जोशी या पात्रांची छोटीशी झलक दाखविण्यात आली आहे. हे दोघेही पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत आहेत. छोट्या पडद्यावरील लाडकी बालकलाकार मायरा वैकुळ ही देखील महत्वाच्या भूमिकेत आहे. अजय मयेकर यांचा 'मर्दिनी' हा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी भावना, थरार आणि नारीशक्तीचा प्रभावी संगम साधला आहे. टीझर रिलीज झाल्यानंतर सोशल मीडियावर टीझरची चर्चा असून, प्रार्थनाच्या मेकओव्हरचे भरभरून कौतुक केले जात आहे. नारीशक्तीच्या अथांग सामर्थ्याला सलाम करणारा 'मर्दिनी' हा चित्रपट येत्या ३ जुलै २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहामध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटासाठी प्रार्थनाचे चाहते उत्सुक झाले आहेत.









# हिमेशसोबत दिसणार मानुषी

हिमेश रेशमियाने स्वत:च्या नव्या गाण्याची घोषणा केली आहे. याचे शीर्षक 'शराब' असून यात तो मानुषी छिल्लरसोबत दिसून येणार आहे. याचे एक पोस्टर शेअर करण्यात आले असून यात हिमेश अन् मानुषी रोमँटिक अंदाजात दिसून येत आहेत. तसेच या गाण्याचा टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे. हिमेशच्या गायनाची त्याच्या चाहत्यांदरम्यान वेगळीच क्रेझ आहे. आता तो स्वत:चे नवे गीत 'शराब'द्वारे चाहत्यांना वेड लावण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. याचा म्युझिक व्हिडिओ पीयूष- शाजिया यांनी कोरियोग्राफ केले आहे. तर गाण्याला हिमेशचा आवाज लाभला असून रजत नागपालने संगीतबद्ध केले आहे. तर गीतलेखन राणा सोतल यांनी केले आहे. हिमेश रेशमिका मागील काही महिन्यांपासून स्वत:च्या पॅन-इंडिया म्युझिक टूरमध्ये व्यग्र राहिला आहे आणि अनेक शहरांमध्ये तो परफॉर्म करतोय. 'तंदूरी नाइट्स' आणि 'हुक्का बार' यासारख्या पसंतीच्या गाण्यांपासून 'लाँग ड्राइव्ह' आणि 'झलक दिखला जा' यासारख्या हिट गाण्यांपर्यंत त्याला स्टेजवर स्वत:चे चार्टबस्टर्स गाताना पाहिले गेले आहे.

# खिलाडीकुमार दिसणार नव्या अवतारात!



खिलाडी कुमार अर्थात सर्वांचा लाडका अक्षय कुमार त्याच्या 'भूत बंगला' चित्रपटातील वेगळ्या भूमिकेमुळे चर्चेत आला होता. अक्षय कुमारच्या या चित्रपटाला चांगला प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला. या चित्रपटाच्या यशानंतर आता अक्षय कुमारच्या आगामी चित्रपटांची उत्सुकता चाहत्यांना लागली असून, अशातच त्याच्या हॉलिवूडच्या तोडीस तोड निर्मिती असलेल्या एका चित्रपटाचे नाव समोर आले आहे. तसेच याबाबत महत्वाची अपडेट देखील आली आहे. हा एक स्पाय- ॲक्शन चित्रपट असणार आहे. प्राथमिक माहितीनुसार, या चित्रपटाचे नाव 'समूक' असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. या प्रोजेक्टचे नाव 'समूक' आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन कनिष्क वर्मा करत आहेत. अक्षय कुमार, विपुल अमृतलाल शाह आणि आशिम शाह यांनी याची निर्मिती केली आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना एलियनसच्या भयानक जगाची एक झलक दाखवेल. विशेष म्हणजे, हॉलिवूडचे स्टंट कोऑर्डिनेटर ल्यूक टंबर हे देखील 'समूक'मध्ये सामील झाले आहेत. त्यांनी 'मिशन: इम्पॉसिबल', 'वेनम' आणि 'प्रिडेटर' यांसारख्या स्पाय- ॲक्शन चित्रपटांवर काम केले आहे. अक्षय कुमार लवकरच वेलकम टू द जंगल या त्याच्या बहुप्रतिक्षित चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात तगडी स्टारकास्ट असून तब्बल ३५ कलाकारांच्या भूमिका आहेत. यात प्रामुख्याने दिशा पटानी, जॅकलिन फर्नांडिस, जॉनी लिव्हर, अर्शद वारसी आणि सुनील शेट्टी यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार आहेत.

# सलमानचे हॉलीवूडमध्ये पदार्पण



बॉलीवूडचा भाईजान सलमान खान आता हॉलीवूडमध्ये झळकणार आहे. ६० व्या वर्षी त्याने हॉलीवूडमध्ये पदार्पण केले आहे. '७ डॉग्स' या चित्रपटातून सलमान ग्लोबल प्रोजेक्टमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. इजिप्तमध्ये '७ डॉग्स' या आंतरराष्ट्रीय ॲक्शन थ्रिलर चित्रपटाचा प्रीमियर सोहळा पार पडला. यासाठी सलमान प्रत्यक्ष उपस्थित नसला तरी भाईजानची जोरदार चर्चा रंगली. प्रीमियरवेळी बॉलीवूडच्या भाईजानचे मोठे पोस्टर्स लक्षवेधी ठरले आहेत तसेच हॉलीवूड चित्रपटातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

"7 Dogs' या चित्रपटाचा प्रीमियर शो इजिप्तमध्ये पार पडला असून, या कार्यक्रमाचे व्हिडीओ आणि फोटो समोर आले आहेत. यामध्ये बॉलीवूड सुपरस्टार सलमान खान लक्ष वेधून घेत आहे. त्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील भव्य पोस्टर्स पाहून चाहते भारावून गेले आहेत. सोशल मीडियावर सर्वत्र सलमान खानच्या हॉलीवूड चित्रपटाचीच चर्चा रंगली आहे. या '७ डॉग्स' चित्रपटात सलमान खानचा 'कॅमिओ रोल' असणार आहे. चित्रपटातील सलमान खानची एन्ट्री व्हायरल झाली असून नेटकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. या चित्रपटात इजिप्शियन स्टार्स करीम अब्देल अझीझ, अहमद एझ आणि मोनिका बेलुची यांच्या मुख्य भूमिका आहेत; तर बॉलीवूडमधील संजय दत्तदेखील या हॉलीवूड चित्रपटामध्ये भूमिका साकारणार आहे. पण, सर्वात जास्त लाईमलाईट सलमान खानच्या विशेष कॅमिओ रोलला मिळाली आहे.

'७ डॉग्स' चित्रपटाच्या प्रीमियरमध्ये रेड कार्पेटवरील भव्य बॅकड्रॉपवर सलमान खानचे पोस्टर लावण्यात आले होते. चित्रपटातील कलाकार रेड कार्पेटवर फोटोसाठी पोज देत असतानाही, मागे असलेल्या सलमानच्या पोस्टरने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. व्हायरल व्हिडीओमध्ये काही लोक सलमानच्या पोस्टरसह सेल्फी घेताना दिसून येत आहेत. त्याचबरोबर चित्रपटातील एन्ट्रीचा व्हिडीओमध्ये सलमानचा हटके लूक दिसून येत आहे. केस कापण्याच्या दुकानामध्ये सलमान खान बसलेला सीन समोर आला असून यावेळी तो इंग्रजी भाषेमध्ये डायलॉग म्हणत आहे. सलमानचा लूक आणि त्याची कॅमिओ एन्ट्री तुफान व्हायरल झाली असून ती चाहत्यांच्या पसंतीस उतरली आहे. नेटकऱ्यांनी यावर हा हॉलीवूड चित्रपट कोणकोणत्या देशांमध्ये प्रदर्शित होणार आहे, असे विचारून उत्सुकता दाखवून दिली आहे. एकाने लिहिले आहे की, ७ डॉग्ज चित्रपटातील सलमान खानचा कॅमिओ, अंगावर अक्षरश: काटा आणणारा आणि पैसा वसूल कॅमिओ आहे. तर दुसर्या नेटकऱ्याने लिहिले आहे की, मी कधीही विचार केला नव्हता की सलमान भाई आंतरराष्ट्रीय चित्रपटामध्ये भूमिका करतील, बघून भारी वाटलं, अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.



# बॉलीवूड डेब्यूने साई पल्लवीचा 'परफेक्ट' रेकॉर्ड डागाळला?

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री साई पल्लवी ही तिच्या नैसर्गिक अभिनयासाठी आणि साधेपणासाठी ओळखली जाते. गेल्या ११ वर्षांत तिने तमिळ, तेलुगू आणि मल्याळम चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. मात्र, तिच्या बॉलीवूड पदार्पणाला अपेक्षित यश न मिळाल्याने आता तिच्या करिअरची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. साई पल्लवीने २०१५ मध्ये 'प्रेमम' या मल्याळम चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. पहिल्याच चित्रपटाने तिला प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. त्यानंतर 'फिदा', 'लव्ह स्टोरी', 'श्याम सिंघा रॉय', 'गार्गी' यांसारख्या चित्रपटांमधील तिच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले. इतक्या वर्षांच्या कारकिर्दीत तिच्या चित्रपटांबद्दल फारशा नकारात्मक प्रतिक्रिया आल्या नव्हत्या. मात्र, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या तिच्या पहिल्या हिंदी चित्रपटामुळे तिच्या नावावर पहिल्यांदाच फ्लॉपचा शिक्का बसल्याची चर्चा आहे. १ मे रोजी प्रदर्शित झालेल्या 'एक दिन' या चित्रपटातून साई पल्लवीने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटात तिच्यासोबत जुनैद खान मुख्य भूमिकेत होता. पण चित्रपटाला प्रेक्षकांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. चित्रपटाबद्दल सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत. काही प्रेक्षकांनी साई पल्लवीच्या हिंदी उच्चारांवर आणि स्क्रीन प्रेझेन्सवर प्रश्न उपस्थित केले. तर काहींचे मत आहे की, दक्षिणेतील प्रेक्षकांनी ज्या पद्धतीने तिला स्वीकारले, तशी प्रतिक्रिया हिंदी प्रेक्षकांकडून मिळालेली नाही. साई पल्लवीच्या करिअरमध्ये आतापर्यंत २०१९ मध्ये आलेला 'एनजीके' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला होता. अनेक चाहत्यांचे म्हणणे आहे की, ती नेहमी आशयघन आणि दमदार भूमिका निवडते. दरम्यान, साई पल्लवी आता बहुचर्चित 'रामायण' चित्रपटात सीतेची भूमिका साकारताना दिसणार आहे.

# 'वेलकम टू द जंगल'च्या गाण्यात २५ कलाकार

'वेलकम टू द जंगल' चित्रपटाचे टायटल ट्रॅक रिलीज झाले आहे. खास म्हणजे गाण्याची सुरुवात पहिल्या चित्रपटातील 'आलू ले लो कांदे ले लो' या प्रसिद्ध डायलॉगने होते. या गाण्यानंतर 'वेलकम टू द जंगल'ने या गाण्याच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण केली आहे. 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटात अक्षय कुमारसोबत सुनील शेट्टी, दिशा पटानी, जॅकलिन फर्नांडिस, अर्शद वारसी, जॅकी श्रॉफ, परेश रावल, रवीना टंडन, लारा दत्ता आणि इतर अनेक दिग्गज कलाकार दिसणार आहेत. या चित्रपटात तब्बल २५ कलाकार असून ते सर्वजण या गाण्यात पाहायला मिळत आहेत. एवढ्या मोठ्या स्टारकास्टमुळे हा चित्रपट बॉलिवूडमधील कौटुंबिक मनोरंजक चित्रपटांपैकी एक मानला जात असून, चित्रपटाचे संगीतही प्रेक्षकांचं मन जिंकणारं आहे.

दरम्यान, हे मूळ टायटल ट्रॅक साजिद-वाजिद यांनी कंपोज केले होते, ज्याला आता विक्रम मोंट्रोसने एका नवीन आणि हाय-एनर्जी अंदाजात रीक्रिएट केले आहे. हे गाणे पूर्णपणे मस्ती आणि मनोरंजनाने भरलेले आहे. शान, प्रिया पाटीदार आणि विक्रम मोंट्रोस यांच्या दमदार आवाजाने गाणे अप्रतिम झाले आहे. हा अल्बम 'वेलकम' फ्रेंचायझीचा संगीतमय वारसा अतिशय उत्कृष्ट पद्धतीने पुढे नेतो. या चित्रपटाचा टीझर १५ मे रोजी रिलीज करण्यात आला होता. यावरून समजते की, चित्रपटाची कथा एका बनावट चित्रपटाभोवती फिरते जी नंतर गडबड होते, आणि तिथून पुढे गोंधळ आणि विनोदाने भरलेली कथा पुढे जाते. अक्षय कुमार दुसऱ्या भागात नव्हता, आता या फ्रँचायझीमध्ये तो पुन्हा परतला आहे. यात त्याला आणि रवीना टंडनला एकत्र पाहायला मिळाल्याने चाहतेही उत्सुक आहे. दरम्यान, हा चित्रपट २६ जून रोजी चित्रपटगृहांमध्ये रिलीज होणार आहे.

# समंथाचा 'या' सिनेमात दमदार अवतार

दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा रुथ प्रभु हिच्या बहुप्रतीक्षित 'मां इंटी बंगारम' या चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला आहे. ट्रेलरमध्ये सामंथाचा जबरदस्त ॲक्शन अवतार पाहायला मिळत असून, सोशल मीडियावर चाहत्यांकडून त्याला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. ट्रेलरची सुरुवात एका साध्या आणि पारंपरिक कुटुंबात नवीन सून म्हणून आलेल्या महिलेपासून होते. समंथा सुरुवातीला शांत, समजूतदार आणि कुटुंबातील सगळ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणारी सून म्हणून दिसते. मात्र, पुढे कथेत मोठा ट्विस्ट येतो आणि तिच्या आयुष्यातील गुपित हळूहळू समोर येऊ लागते. कुटुंबावर संकट आल्यावर सामंथा धाडसी आणि ॲक्शन अवतारात दिसते. ट्रेलरमध्ये तिचे फाईट सीन्स, दमदार संवाद आणि स्टायलिश ॲक्शन चाहत्यांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. आतापर्यंत रोमँटिक आणि भावनिक भूमिकांमध्ये दिसलेली सामंथा या चित्रपटात पूर्णपणे वेगळ्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. 'मां इंटी बंगारम' हा चित्रपट सुरुवातीला १५ मे रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र, काही कारणांमुळे त्याची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली. आता हा चित्रपट १९ जून रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. समंथाने स्वतः तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर ट्रेलर शेअर करत चाहत्यांना खास संदेश दिला. तिने पोस्टमध्ये आता ट्रिगर दाबण्याची वेळ आली आहे असे लिहिले. तिच्या या पोस्टनंतर सोशल मीडियावर ट्रेलरची जोरदार चर्चा सुरू झाली. या चित्रपटाचे दिग्दर्शन नंदिनी रेड्डी यांनी केले आहे. चित्रपटाची निर्मिती समंथा, राज आणि हिमांक यांनी मिळून केली आहे. ट्रेलर पाहिल्यानंतर अनेक चाहत्यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींनी सर्वात दमदार ट्रेलर, स्क्रीनची खरी क्वीन परतली अशा कमेंट्स केल्या आहेत. तर काहींनी समंथाच्या ॲक्शन आणि स्क्रीन प्रेझेन्सचे कौतुक केले आहे. 'मां इंटी बंगारम' ही एका अशा महिलेची कथा आहे जी एका पारंपरिक कुटुंबात सून म्हणून प्रवेश करते. मात्र, तिच्या भूतकाळात अनेक गुपिते दडलेली असतात. जेव्हा जुने शत्रू परत येतात, तेव्हा ती आपल्या कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी स्वतःची खरी ओळख लपवत लढा देते. हा चित्रपट प्रेक्षकांना थिएटरमध्ये खिळवून ठेवेल, अशी चर्चा सध्या सुरू आहे.



# 'या' अभिनेत्याने एका चित्रपटासाठी तीन वेळा बदलली बॉडी

राम चरण हा एक लोकप्रिय अभिनेता आहे. त्याने आतापर्यंत अनेक चित्रपटे केली आहेत आणि तसेच ती गाजली देखील आहेत. तर आता तो एका त्याच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. तर हा आगामी चित्रपट म्हणजे 'पेड्डी'. ४ जून रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. नुकताच एक टीझर प्रदर्शित झाला असून, त्यात राम चरणच्या पात्राची झलक पाहायला मिळत आहे. टीझर प्रदर्शित होताच त्याच्या चाहत्यानी खुप कौतुक केले आहे. 'पेड्डी' या चित्रपटातील भूमिकेसाठी राम चरणने एक जबरदस्त शरीरयष्टी कमावली आहे. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र, हे परिवर्तन सोपे नव्हते, असे खुद्द अभिनेत्याने उघड केले आहे. 'पेड्डी'च्या भूमिकेसाठी राम चरणने आधी क्रिकेटपटूच्या, मग कबड्डीपटूच्या भूमिकेची तयारी केली आणि अखेरीस त्यासाठी त्याने पैलवानासारखी धिप्पाड शरीरयष्टी घडवली आहे. हैदराबादमध्ये चित्रपटाच्या प्रसिद्धी कार्यक्रमात राम चरण म्हणाला, हे पात्र साकारण्यासाठी मला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. हा फिटनेसचा प्रवास अजिबात सोपा नव्हता आणि दिग्दर्शकाने मला खूप त्रास सहन करताना पाहिले. सर्वात आधी, मला क्रिकेटपटूसारखी सडपातळ शरीरयष्टी तयार करावी लागली. त्यानंतर, भूमिकेसाठी मला कबड्डीपटूसारखे पिळदार, त्यानंतर, मला पैलवानासारखी धिप्पाड शरीरयष्टी तयार करावी लागली. तर या चित्रपटासाठी हे गरजेचे होते. पण हे माझ्यासाठी खुप आव्हानात्मक राहिले, असे त्याने सांगितले.



# प्रिती झिंटाचं दमदार कमबॅक!



ड्रोंगो फिल्म्सच्या बॅनरखाली कुणाल खेमू आणि चिराग निहलानी निर्मित VIBE या चित्रपटामध्ये कुणाल खेमू, प्रिती झिंटा, स्पर्श श्रीवास्तव आणि वंशिका धीर प्रमुख भूमिकांमध्ये झळकणार आहेत. VIBE ही दोन जिवलग मित्रांची कथा आहे, ज्यांचे आयुष्य अचानक पूर्णपणे बदलून जाते, जेव्हा ते नकळत एका धोकादायक परिस्थितीत अडकतात, ज्याची त्यांनी कधी कल्पनाही केलेली नसते. अमेझॉन एमजीएम स्टुडिओजने आज आपल्या हाय-स्टेक्स ॲक्शन-कॉमेडी चित्रपट VIBE ची थिएटर रिलीज डेट १८ सप्टेंबर जाहीर केली.

कुणाल खेमू आणि चिराग निहलानी यांनी ड्रोंगो फिल्म्सच्या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती केली असून, हा त्यांच्या प्रोडक्शन हाऊसचा पहिलाच चित्रपट आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन कुणाल खेमू यांनी केले आहे. चित्रपटात कुणाल स्वतः झळकणार असून त्याच्यासोबत प्रिती झिंटा, स्पर्श श्रीवास्तव आणि प्रथमच पदार्पण करणारी वंशिका धीर प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. VIBE ची कथा दोन जिवलग मित्रांच्या आयुष्याभोवती फिरते. या मित्रांचं साधं आणि शांत आयुष्य अचानक एका अनपेक्षित वळणावर बदलतं. हा प्रवास त्यांच्या मैत्रीची कठीण परीक्षा घेतो. अमेझॉन एमजीएम स्टुडिओजचा तडखइए हा चित्रपट १८ सप्टेंबर रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. प्रिती झिंटाला या चित्रपटाच्या निमित्ताने अनेक दिवसांनी मोठ्या पडद्यावर बघण्यासाठी चाहते उत्सक आहेत.

# प्रेम कायम प्रभावी असतं!

तामिळनाडूमध्ये व्हीसीके आणि आययूएमएलच्या पाठिंब्याने, थलपती विजय यांच्या टीव्हीके पक्षाने आता सरकार स्थापन केले आहे. विजय यांनी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी शपथ घेतली. टीव्हीकेच्या नऊ आमदारांनीही मंत्री म्हणून शपथ घेतली. या सोहळ्याला अभिनेत्री त्रिशा कृष्णन हिने देखील हजेरी लावली होती. या कार्यक्रमातील त्रिशाच्या लुकने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर आता तिने या कार्यक्रमादरम्यानचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडियावर शेअर केले आहेत. या पोस्टला तिने दिलेल्य कॅप्शनने अनेकांचं लक्ष वेधलं आहे. अभिनेत्रीने नुकतच इन्स्टाग्रामवर ब्लू रंगाच्या सिल्क साडीतले काही फोटो शेअर केले आहे. सोन्याच्या जरीची नक्षी असलेल्या या साडीवर तिने ऑफ व्हाइट रंगाचा ब्लाऊज आणि साधे दागिने परिधान केले होते.



या पोस्टला त्रिशाने 'प्रेम कायम सगळ्यात प्रभावी असतं' अशी कॅप्शन दिली आहे. अनेकांनी या पोस्टचा संबंध विजयशी लावला आहे. त्रिशा कृष्णन आणि विजय यांच्या रिलेशनशिपच्या चर्चा अनेक वर्षांपासून सुरू आहेत. दोघांनीही अनेक सुपरहिट तमिळ चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. मात्र, या चर्चांवर दोघांनीही कधीही भाष्य केलेलं नाही. अलीकडेच विजय यांच्या पत्नीने संगीता यांनी घटस्फोटाची याचिका दाखल करत विजय यांचे लोकप्रिय अभिनेत्रीसह विवाह बाह्य संबंध असल्याच्या दावा केला होता. तेव्हापासून या दोघांबद्दल चर्चात अधिक सुरू झाल्या. अशातच आता विजय यांच्या शपथविधी सोहळ्यानंतर त्रिशाने पोस्ट शेअर करत लिहिलेल्या कॅप्शनने पुन्हा एकदा चर्चांनी जोर धरला आहे.

बॉलिवूड अभिनेत्री पूजा बेदी हिने आमिर खानच्या 'जो जिता वही सिकंदर' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये दमदार पदार्पण केलं होतं. मात्र, करिअरच्या शिखरावर असतानाच तिने लग्नासाठी चित्रपटसृष्टी सोडण्याचा निर्णय घेतला होता. अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीत तिने तिचं लग्न, घटस्फोट आणि कुटुंबाबद्दल मनमोकळेपणाने भाष्य केलं आहे. पूजाने सांगितले की, तिने १९९४ मध्ये फरहान फर्निचरवाला यांच्याशी लग्न केलं होतं. अत्रिनेत्री याबद्दल म्हणाली, मी एका मुस्लिम व्यक्तीशी लग्न केलं, पण त्या काळात आजसारखा हिंदू- मुस्लिम वाद नव्हता. त्या वेळी समाज अधिक धर्मनिरपेक्ष या विचारांवर चालणारा होता आणि लोकशाहीवादी होता. सासरचे लोक पारंपरिक विचारांचे असल्याने स्वतःची ओळख जपत तिथे राहणं कठीण झालं असतं, असंही तिने सांगितलं. त्यामुळेच 'जो जीता वही सिकंदर'नंतर मिळालेल्या अनेक चित्रपटांच्या ऑफर तिने नाकारल्या. असंही ती म्हणाली.

पूजा पुढे म्हणाली, मी पत्नी आणि सून म्हणून आयुष्य जगायचं ठरवलं होतं आणि त्यात सर्वोत्तम बनायचं होतं. त्या काळात लग्नानंतर अभिनेत्रींचं करिअर संपल्यासारखं मानलं जायचं, असंही तिने सांगितलं आहे. लग्नाबद्दल बोलताना पूजा म्हणाली की, आयुष्यात अनेक चुका केल्या, पण माझं लग्न ही चूक नव्हती. लग्न हा एक अनुभव आणि प्रवास असतो. तिने तिचे विभक्त पतीचे आभार मानत सांगितलं की, माझ्या दोन सुंदर मुलांसाठी मी त्यांची कायम ऋणी आहे. आजही माझे विभक्त पती माझे सर्वात चांगले मित्र आहेत. १२ वर्षांच्या संसारानंतर दोघांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी तिची मुलगी ५ वर्षांची तर मुलगा २ वर्षांचा होता. याबद्दल पूजा म्हणाली, मी २४ व्या वर्षी लग्न केलं आणि ३२ व्या वर्षी घटस्फोट घेतला. मी लग्नात आनंदी होते आणि घटस्फोटानंतरही आनंदी होते. १२ चांगली वर्षे चांगली म्हणून पुढची ५० वर्षे वाईट घालवायची गरज नाही. तिने पुढे सांगितलं की, घटस्फोट हा आयुष्यातील कठीण टप्पा होता. पण नातं सुधारण्याच्या पलीकडे गेलं आहे, हे लक्षात आल्यानंतर निर्णय घ्यावाच लागतो. पूजा म्हणाली की, तिला घटस्फोट वाईट वाटत नाही कारण तिचे आई-वडील कबीर बेदी आणि प्रतिमा बेदी यांचाही ती पाच वर्षांची असताना घटस्फोट झाला होता. मात्र, वेगळं झाल्यानंतरही त्यांच्यात मैत्रीपूर्ण आणि आदराचं नातं कायम होतं.

# पुजाला लग्न ही चूक वाटते!



# दुनियादारीनंतर मी हवेत होतो!


'दुनियादारी' २०१३ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. अंकुश चौधरी, स्वप्नील जोशी, सई ताम्हणकर, उर्मिला कोठारे, जितेंद्र जोशी यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. याबाबत दिग्दर्शक संजय जाधव यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. प्रेक्षकांना आता माझ्या कामावर विश्वास राहिलेला नाही, अशी खंत संजय जाधव यांनी व्यक्त केली आहे. दिग्दर्शक संजय जाधव एका मुलाखतीमध्ये म्हणाले की, माझे पहिले प्रेम सिनेमेटोग्राफी आहे. मी स्वतःला कधी दिग्दर्शक मानत नाही.

अपघाताने मी दिग्दर्शक झालो. मी कॅमेरामन आणि टेक्निशियन म्हणून जन्माला आलो आहे. प्रत्येक मराठी प्रेक्षकाने 'दुनियादारी' चित्रपट पाहिला आहे. याबाबत जाधव म्हणाले की, दिग्दर्शक म्हणून 'दुनियादारी' माझा पहिलाच चित्रपट होता. कॅमेरामन म्हणून ब्रेक मिळाल्यामुळे मी सहज दुनियादारी कादंबरीवर काम केले. 'दुनियादारी' करताना असे कधी वाटले नाही की तो एवढा लोकप्रिय होईल. मी पहिल्या दिवशी गणेश टॉकीजला गेलो आणि थिएटर हाऊसफुल होते. मला वॉचमनने आतासुद्धा सोडले नव्हते, कारण त्याला मी माहितीसुद्धा नव्हतो. यश मिळाल्यानंतर लोकांच्या आपल्याकडे पाहण्याच्या नजरा बदलतात, आपला विचार बदलतो. दुनियादारीच्या यशानंतर मी हवेमध्ये होतो, अशी कबुली दिग्दर्शक संजय जाधव यांनी दिली. पुढे ते म्हणाले की, पुढचा कितीतरी काळ मी दुनियादारीच्या यशानंतर हवेमध्ये राहिलो होतो. मी लोकांशी नीट बोलतोय असे मला वाटायचे, पण तसे नव्हते. मराठी चित्रपटसृष्टीची दिशा बदलणारा यशस्वी चित्रपट दिल्यानंतर तुम्ही इतरांपेक्षा वेगळे होता; माझे तसे झाले. त्यावेळी मी अनेकांना माझ्या बोलण्यातून वागण्यातून दुखावले. 'प्यार वाली लव्ह स्टोरी' चित्रपट फ्लॉप होईपर्यंत मी असाच हवेमध्ये होतो, असे संजय जाधव म्हणाले आहेत. पुढे ते म्हणाले, दुनियादारी २ करणे मला झेपणार नाही. 'दुनियादारी २' हा प्रोजेक्ट खूप वेळा सुरू होऊन बंद झाला आहे, त्यामुळे आता असे वाटते की सुहास शिरवळकरसुद्धा वरून सांगत आहेत की नको करू; त्या संकेतांचा आपण मान ठेवला पाहिजे. लॉकडाऊनमुळे प्रोजेक्ट थांबला आणि नंतरसुद्धा खूप वेळा काम थांबले. आता माझ्यावर आणि माझ्या स्क्रिप्टवर लोकांचा विश्वासच राहिला नाही. त्यामुळे मला आता करायचेच नाही असे स्पष्ट मत दिग्दर्शक संजय जाधव यांनी व्यक्त केले आहे.



# जवळचा माणूस जपता आला पाहिजे!

प्रवीण तरडे दिग्दर्शित 'देऊळ बंद २' या सिनेमाची सध्या मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. या सिनेमात मोहन जोशी, स्नेहल तरडे, प्रसाद ओक, मंगेश देसाई, अतुल कुडाळ असे अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसले आहेत. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर कोट्यवधींची कमाई करत आहे. प्रेक्षक या सिनेमाला उत्तम प्रतिसाद देत आहेत. सिनेमाची चर्चा होत असतानाच सध्या प्रवीण तरडे यांच्या वक्तव्यांचीदेखील चर्चा होताना दिसत आहे. प्रवीण तरडे यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी विविध विषयांवर वक्तव्य केले. जेव्हा यश मिळाले, प्रसिद्धी मिळाली त्यानंतर आपली माणसं दुरावली की आणखी काही जोडली गेली? यावर प्रवीण तरडे म्हणाले, माझ्याकडून आजपर्यंत एकही माणूस तुटलेला नाही. लहानपणी जेव्हा कळायला लागलं, तेव्हा झालेले मित्र आजही माझे मित्र आहेत. आजही मी मित्रांसाठी वाढदिवसाची पार्टी ठेवली तर मोठमोठे मंत्रीसुद्धा त्या पार्टीत असतात. जितक्या आत्मियतेने मी एखाद्या मोठ्या मंत्र्याला निरोप देतो, तितक्याच आत्मियतेने मी माझ्या त्या मित्रालाही मेसेज करतो. कारण माणूस तुटता कामा नये.ज्या रुममध्ये कॉट बेसिसवर राहत होतो.तेव्हा संघर्षकाळात कधी कधी डबा नसायचा. तेव्हा समोरच्या कॉटवरच्या मुलाचा अर्धा डबा खायचो. तो मुलगा आजही माझ्याबरोबर आहे. पुढे ते म्हणाले की जर तुम्ही तुमच्या बरोबरीची माणसं पुढे घेऊन गेला नाहीत, तो मोठा झाला नाही तर तुमच्या मोठे होण्याला, पुढे जाण्याला काही अर्थ नाही. माझ्या पहिल्या सिनेमात विनोद वनवे आणि राम खाटमोडे हे दोघेजण असिस्टंट डायरेक्टर होते. दोन सिनेमांनंतर मी त्यांना सांगितलं की आता माझ्याकडे काम करायचं नाही. ते घाबरले, आम्हाला का काढत आहात, असं विचारलं. मी त्यांना म्हणालो की आता तुम्ही स्वतःचा सिनेमा केला पाहिजे आणि तुमचा सिनेमा करून देणं, ही माझी जबाबदारी आहे. म्हणून, विनोद वनवे व राम खाटमोडेचा नवरदेव बीएससी अॅग्रीकल्चर हा सिनेमा आला. माझं म्हणणं असं असतं की आता असिस्टंट म्हणून येऊ नका, स्वतःचा सिनेमा करा. ते असेही म्हणाले की, जेव्हा माझा असिस्टंट डायरेक्टर स्वतःचा सिनेमा करेल, तेव्हा मी मोठा होईन.





# खूप लोकांना मिरची लागलीये

७९ व्या 'कान्स फिल्म फेस्टिव्हल' या प्रतिष्ठित सोहळ्याला यंदा लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळीने उपस्थिती लावली होती. मराठी भाषेचं प्रतिनिधीत्व करण्यासाठी प्राजक्ता माळी, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ व अभिनेत्री निवेदिता सराफ, 'कोकण हार्टेड गर्ल' अंकिता वालावलकर हे सगळे कलाकार कान्सला पोहोचले होते. यावेळी कान्सच्या रेड कार्पेटवर प्राजक्ता माळीने सुंदर अशी नऊवारी साडी नेसली होती. तिच्या या पारंपरिक लूकचं सर्वत्र कौतुक करण्यात आलं. प्राजक्ताचे रेड कार्पेटवरील असंख्य फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. पहिल्यांदाच रेड कार्पेटवर येऊनही तिचा आत्मविश्वास, रुबाबदार अंदाज या सगळ्याचं चाहत्यांसह सेलिब्रिटींनी देखील कौतुक केलं. मात्र, प्राजक्ताला काही लोकांनी विनाकारण ट्रोलही केलं. या सगळ्यांचा समाचार घेत सई ताम्हणकरने आपल्या लाडक्या मैत्रिणीला पाठिंबा दिला आहे. सई ताम्हणकर म्हणाली, मी कधी कान्सला गेले, तर मला माझा चित्रपट कान्सपर्यंत घेऊन जायला आवडेल. जेवढं मी काम करणं एन्जॉय करतेतेवढंच मी फोटोशूट, स्टाइल वगैरेही तेवढंच एन्जॉय करते. त्याम ुळे मला नवनवीन प्रयोग करायला नेहमीच आवडतात. एक गोष्ट मी आवर्जून नमूद करतेमला प्राजक्ता माळीचा खूप-खूप अभिमान आहे. म ला असं वाटतं ज्या सुंदर पद्धतीने तिने स्वतःला कान्सच्या रेड कार्पेटवर सादर केलं, ते खूप भारी होतं. अर्थात ज्यामुळे खूप लोकांना मिरची लागलेली आहे कारण, तिच्याकडे खूप लोकांचं लक्ष आहे आणि मला तुझा खूप अभिमान वाटतोय प्राजक्ता! माणसं काहीही केलं तरी बोलतात, आता तक्रारी करण्यापेक्षा एखाद्याचं यश आपण सेलिब्रेट केलं पाहिजे. असं सईने सांगितलं. दरम्यान, रेड कार्पेटवर एन्ट्री घेतल्यावर प्राजक्ताच्या चेहऱ्यावर प्रेक्षकांना कमालीचा आत्मविश्वास पाहायला मिळाला. मोरपिशी रंगाची नऊवारी साडी, त्यावर भरजरी शेला, गळ्यात ठुशी, हातात मराठमोळे तोडे, कमरपट्टा असा पारंपरिक साज करून प्राजक्ता कान्सच्या रेड कार्पेटवर चालली. प्राजक्ताने या सोहळ्याला पेशवाई सिल्क नऊवारी साडी नेसली होती. यावेळी अभिनेत्रीने ११५ वर्षे जुनी नथ परिधान केली होती.

# 'मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश'

## मराठी चित्रपट गीतकार: शांता शेळके

**'गणराज रंगी नाचतो...' तसेच 'गजानना श्री गणराया' शांता शेळके यांनी श्री गणेशावर रचलेल्या या दोन भक्तियुक्त कवनांचा उल्लेख केल्याखेरीज राहावत नाही. 'मी नवनवलांचे स्वप्न काल पाहिले...' १९५० सालच्या 'राम राम पाव्हण' चित्रपटात प्रेमपूर्तीच्या आनंदात नायिका रत्नमाला आरशात पाहून स्वत:च्याच प्रतिबिंबाशी हे समर्पक शब्द उच्चारतात व 'तू गुपित कुणाला सांगू नको आपले' असे बजावतात. 'स्वप्नात सावळा हरी ये वाजवीत बासरी...' स्वप्नातील प्रेम प्रसंगातही कृष्णाचा दृष्टांत देऊन कवयित्री पावित्र्य राखतात. गाण्यातील मोहकता वाढते.**

'भरजरीच्या पदरा तुला वाऱ्यावर सोडते। शोध सखा सजनाचा राया तुला धाडते...' सिनेगीताच्या पदार्पणाच्या काळात 'शिवा रामोशी' या १९५१ सालच्या सिनेमातील सर्वच गाण्यांत शांताबाईंची प्रतिभा पणास लागली होती. सिनेगीत होते म्हणून पदर वाऱ्यावर सोडता आला अन्यथा पदर शशिराला बिलगून ठेवण्यासंबंधी लिहिले असते. शृंगार रस हा नैसर्गिक दृष्टांताद्वारे वा भावनांद्वारे प्रकट केल्यास चावट अर्थास वाव मिळत नाही, असे त्या म्हणत.

'लाजाळू माझी प्रीत लपे माझ्या पापणीत...' १९६० च्या 'स्वराज्याचा शिलेदार'मधील या गाण्यात प्रीतीची कबुली देताना लज्जेने पापण्या मिटल्या जातात. शांताबाईंच्या काव्यातील दृष्टांत कल्पनातीत असतात. सहजपणे साधे शब्द अक्षरशः बागडून काव्याला उंची प्राप्त करून देतात. 'सोन सकाळी सर्जा सजला हसलं हिरवं रान...' १९६० च्या 'मोहित्यांची मंजुळा' सिनेमात हिरव्या रानातील पांदणीतून बैलगाडीतला प्रवास शेतातील रानपाखरांच्या किलबिलाटाच्या साथीत प्रसन्नता जागवितो. 'पिढ्यापिढ्यांचं पातक सरलं शिवनेरीला शिव अवतरलं शिवरायांच्या मंगल चरणी पावन झाली अवघी धरणी जय भवानी बोल गर्जती आज पाचही प्राण राघुमैना रानपाखरं गाउ लागली गान' चित्रपटात शिवरायांचा नुकताच जन्म झालेला असतो व संपूर्ण निसर्गराजी खूश असते. त्यावरील रम्य वर्णन आहे. शांताबाईंच्या शालीन चेहऱ्यावर सरस्वतीचे व मांगल्याचे तेज होते. साहित्याच्या सर्व क्षेत्रात अव्वल काव्यरचनेने बाजी जिंकूनही त्यांचे पाय जमिनीवर होते. 'रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी...' १९६३ सालच्या 'मराठा तितुका मेळवावा' चित्रपटात प्रत्यक्ष नृत्यसम्राज्ञी हंसा वाडकरवर चित्रित या बैठकीतील लावणीचे बोल लिहिण्यासाठी म्हणूनच शांताबाईंची निवड केली असावी. लावणीतील चावट शब्दांना कलाटणी देऊन शृंगार रसात घोळण्याची किमया त्यांच्या साध्या शब्द भंडारात होती. 'तुम्ही माझ्या पदराचा शेव काहो ओढीला...' असे ठसक्यात सांगणारे, पण खेळकर अंदाजातील शब्दांच्या मर्यादित काव्यरचना होती. ही लावणी अजरामर ठरली. 'मराठी पाऊल पडती पुढे...' 'मराठा तितुका मेळवावा'तील शांताबाईंच्या या समर गीताला 'मराठी राजभाषा दिन' गीताचा बहुमान प्राप्त झाला. 'काय बाई सांगू कसं मी सांगू...' नुकत्याच प्रेमात पडलेल्या मुलीच्या चेहऱ्यावरील गोड लज्जास्पद भावना उलगडून सांगतांना तिला आनंदाच्या ऊर्मी येतात. अबोल चेहर्यावरील लालिमा मात्र लपविता येत नाही. अशा स्वप्नाळू नैसर्गिक अगतिकतेचे थोडे शृंगारिक वर्णन शांताबाईंनी १९६७ च्या 'पवनाकाठचा धोंडी'मधील या गाण्यात रंगतदार करून अवखळ मजा आणली. 'कशी गौळण राधा बावरली' - 'एक गाव बारा भानगडी' या १९६८ च्या गाण्यात



जयश्री गडकर तमाशात असूनही रेल्वेतील प्रवासात समोर बसलेल्या देखण्या अरुण सरनाईककडे पाहून शालीन भावात अंतरंगातील भाव अतिशय लिनतेने या गाण्यात प्रकट करते.'कृष्णच नेत्री, कृष्णच गात्री कृष्णात राधा विरघळली...' त्यांना त्यात कृष्णाचेच रूप दिसले. शांताबाईंच्या काव्यातील हे वैशिष्ट्य होते.

'मागते मन एक काही दैव दुसरे घडविते...' १९६९ च्या 'तांबडी माती'तील या गाण्यात दैवाचा अकस्मात आघात वर्णिताना म्हणतात मनातील इच्छेविरुद्ध घडणे दैवाचा खेळ असतो. काही फुलांचा शेवट पूर्ण उकलन होण्याआधी पायदळी तुडविण्यात होतो. 'चंद्रेखा प्रतिपदेची कोण तिमिरी बुडविती...' अमावास्येनंतर प्रतिपदेला लाजत उगविलेली चंद्राची कोर काही काळातच अंधारात गुडूप होते. चपखल दृष्टांत. 'माय धरित्रीच्या दारी पडे देवाच पाऊल...' अरुणोदयाचे वर्णन मोठमोठ्या कवींनी आजवर केलीत. शांताबाईंनी १९८२ सालच्या 'भुजंग' चित्रपटात, ग्रामीण स्त्रीच्या मुखी शोभणार्या भाषेत, ग्रामीण दृष्टांत देऊन, ग्रामीण वास्तवता हुबेहूब प्रकट केली. या चित्रपटातील दर्जेदार व प्रत्यक्षावर आधारित रचनेमुळे शांताबाईंना केंद्र सरकारचा उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार मिळाला होता. 'मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश' मानवी शब्दांच्या व स्वरांच्या प्रत्यचनेतून भावभक्तीपर गाण्याचा बाण थेट दर्शकांच्या हृदयात घर करेल, हे शांताबाई व आशा भोसले यांनी वरील १९८३ सालातील 'महानंदा' चित्रपटातील या भक्तिगीतातून सिद्ध केले. शब्दशक्तीतील सामर्थ्याने प्रत्यक्ष परमेश्वर साकार करण्याचे कसब शांताबाईत होते. मंगेश रूपातील भगवान शंकराच्या स्वरूपाचे विहंगम वर्णन करून या गाण्याला देवघरात स्थान मिळवून दिले. शांताबाई यांच्या काव्यसागरातून काही गाणी ओंजळीत घेण्याचा प्रयत्न केला. पुण्याजवळील चाकण रोडवरील मंचर गावी विणकर समाजात १९ ऑक्टोबर १९२२ रोजी शांताबाई जनार्दन शेळके यांचा जन्म झाला. त्यांनी कवयित्री, लेखिका, चित्रपट गीतकार, वृत्तपत्र स्तंभ लेखिका, लेखनिका, प्राध्यापिका आदी क्षेत्रात साहित्य सेवा केली. १९५० सालचा 'राम राम पाव्हण' हा त्यांचा पहिला सिनेमा. त्यांनी अनेक सिनेमातून ३०० च्या वर गाणी लिहिलीत. त्यांना साहित्य अकॅडमी पुरस्कार १९८९, चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कार २००१, ग. दि. मा. गीत लेखन पुरस्कार १९९६, केंद्र सरकारद्वारा उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार 'भुजंग' चित्रपटातील गीतांसाठी मिळाला १९८२. महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार १९८४ आदी पुरस्कार मिळालेत. आळंदी येथे अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद १९९६ साली भूषविले. १९९९ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने पुरस्कृत केले. अशा काव्यप्रभू शांताबाई शेळके यांची लेखणी ६ जून २००२ रोजी कायमची थांबली. तेव्हा म्हणावेसे वाटले... 'हरपली माधुरी संपली चारुता राहिली व्यापुनी अंतरी शून्यता आज पर्णावरी मूक होई कविता...'

**रमेश पोफळी**

# लेकाच्या लोकप्रियतेची आर.माधवनला वाटतेय भीती

'एकापेक्षा आर.माधवन आता फक्त उत्कृष्ट अभिनेता-दिग्दर्शक म्हणूनच नाही, तर मुलगा वेदांत माधवनचा बाबा म्हणूनही ओळखला जातो. वेदांतने फ्रीस्टाईल स्विमिंगमध्ये जगभरात अनेक पदके जिंकली आहेत. आर. माधवन अनेकदा सार्वजनिकरित्या मुलाच्या यशाचा आनंद साजरा करताना दिसतो. तसंच, वेदांतच्या ट्रेनिंग आणि तयारीबद्दलही तो चाहत्यांबरोबर माहिती शेअर करत असतो. आर. माधवनने २०२५ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत सांगितलं होतं. आर. माधवन म्हणाला, तो निर्णय योग्य वेळी घेणं खूप गरजेचं होतं. वेदांत किशोरवयात शारीरिक वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यातून जात होता. त्या काळात त्याला पोहण्यासाठी स्विमिंग पूल मिळाला नसता, तर त्याच्या आंतरराष्ट्रीय स्विमिंग करिअरचा शेवट झाला असता. त्या काळात मुंबईसह संपूर्ण देशातील स्विमिंग पूल कोविड-१९ मुळे बंद करण्यात आले होते, अशी आठवण आर. माधवनने सांगितली. इतर अनेक देशांमध्ये खेळाडूंच्या सरावावर परिणाम होऊ नये म्हणून सरकारांनी सार्वजनिक स्विमिंग पूल पुन्हा सुरू केले होते. मात्र भारतात तशी परिस्थिती नसल्यामुळे तो आणि पत्नी सरीता बिर्जे खूप चिंतेत आणि त्रासात होते, असंही त्याने नमूद केलं. आर.माधवन म्हणाला, जर्मनी, फ्रान्स आणि चीनसारख्या देशांनी स्विमिंग पूल पुन्हा सुरू केले होते आणि ते कोविडमुक्त झोन म्हणून सुरक्षित ठेवले होते. विद्यार्थ्यांना काही महिने तिथे राहून सराव करण्यास सांगितलं जात होतं. त्या काळात काही खेळाडूंनी तर जागतिक विक्रमही मोडले. वेदांतसाठी ही संधी गमावणं परवडणारं नव्हतं.

अभिनेत्याने पुढे सांगितलं की, दुबईमध्ये कडक नियम आणि देखरेखीखाली पुन्हा ट्रेनिंग क्लासेस सुरू झाल्याचं समजताच त्याने तिथे स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. आर.माधवनने सांगितलं की, पत्नी सरीता बिर्जे आधी वेदांतबरोबर दुबईला गेली होती आणि



काही दिवसांनी तोही तिथे पोहोचला. हा निर्णय योग्य ठरला, कारण त्यानंतर वेदांतने उत्कृष्ट कामगिरी केली, असं माधवनने सागितलं आहे. तो म्हणाला, माझ्या कामामुळे वडील म्हणून काही गोष्टी मला करता येत नाहीत. माझी पत्नी माझ्यापेक्षा मुलाबरोबर अधिक वेळ घालवणारी आणि जबाबदारी सांभाळणारी पालक आहे. मी जास्त करून मार्गदर्शन आणि समजावून सांगण्याचं काम करतो वेदांतला काय करायला हवं हे सांगतो. आर.माधवनने पुढे सांगितलं, वेदांत भविष्यात आणखी मोठं यश मिळवेल की नाही, याची मला चिंता नाही. पण त्याला इतकं समजायला हवं की ही प्रसिद्धी कायम राहणार नाही. तो पुढे म्हणाला, पण त्याच वेळी आम्ही थोडं चिंततेही असतो. एवढ्या लहान वयात वेदांतला खूप लोकप्रियता मिळाली आहे. दरम्यान, आर.माधवनचा मुलगा वेदांत माधवनबद्दल बोलायचं झालं तर त्याने ४८ व्या ज्युनिअर नॅशनल ॲक्वेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये चार सुवर्ण आणि तीन रौप्यपदके जिंकली होती. याशिवाय, गेल्या वर्षी मलेशियन ओपन स्पर्धेतही त्याने भारतासाठी पाच सुवर्णपदके पटकावली होती.

# ...तर 'बॉडीगार्ड' सिनेमात दिसली असती डेझी!

अभिनेत्री डेझी शाह हा मनोरंजनविश्वातील लोकप्रिय चेहरा आहे. डेझी शाह बराच काळ  इंडस्ट्रीत सक्रिय आहे. बॉलिवूसह तिने काही कन्नड चित्रपटांमध्येही अभिनय केला आहे.मात्र, सलमान खानच्या जय हो या चित्रपटात काम करून ती रातोरात स्टार झाली. परंतु. तुम्हाला माहितीये का जय हो चित्रपटाआधी तिला सलम ानच्या बॉडीगार्ड या चित्रपटासाठी विचारणा करण्यात आली होती. पण, तिने ही ऑफर नाकारली. एका मुलाखतीमध्ये स्वत डेझीने याबद्दल खुलासा केला आहे. शिवाय चित्रपट नाकारण्यामागचं कारणही सांगितलंय. अलिकडेच बॉलिवूड बबल सोबत संवाद साधताना डेझी शाह म्हणाली, मला त्यांच्यासमोर जे काही बोलायचं होतं ते बोलण्यासाठी मला माझं सगळं धैर्य एकवटावं लागलं. जेव्हा मी चित्रपटाची ऑफर नाकारली, तेव्हा खोलीत जवळपास पाच ते सात मिनिटं शांतता होती. मी मनातल्या मनात विचार करत होते, सलमान सरांनी काहीतरी बोलावं... अखेर ते फक्त एवढंच बोलले की, ठीक आहे.  मग डेझी सलमानचं कौतुक करत म्हणाली, इंडस्ट्रीतील सर्वात जास्त काळजी घेणार्या लोकांपैकी ते एक आहेत. मग चित्रपटाचा सेट असो किंवा वैयक्तिक आयुष्यात ते प्रत्येकाची तितकीच काळजी घेतात. दरम्यान, चित्रपटसृष्टीत अभिनेत्री म्हणून पूर्णवेळ काम करण्यापूर्वी, डेझी कोरिओग्राफर गणेश आचार्य यांची असिस्टंट म्हणून काम करत असे. यानंतर तिने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत एन्ट्री केली. याचनंतर सलमान खानने तिला 'बॉडीगार्ड'साठी विचारले होते. मात्र, डेझी शाहने त्याला नकार दिला.डेझी शाहने खुलासा केला आहे की, 'बॉडीगार्ड' चित्रपटातील आपली भूमिका खूपच लहान आहे असं वाटल्यामुळे तिने या चित्रपटासाठी नकार दिला होता. डेझीने नकार दिल्यानंतर, ती भूमिका हेझल कीचने साकारली. सुमारे दीड वर्षानंतर, सलमानने पुन्हा डेझीशी संपर्क साधला आणि तिला 'जय हो'साठी ऑडिशन देण्यास सांगितलं.





# सोनालीने सांगितला बॉलीवूडमधील संघर्ष

सोनाली बेंद्रे बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. सोनालीचं आयुष्य हे खडतर आव्हानांनी भरलेलं राहिलं आहे. अशातच आता अभिनेत्रीने या सगळ्याबद्दल तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत. सोनालीने एका मुलाखतीत 'सरफरोश' या चित्रपटाबद्दल म्हणाली, माझे चित्रपट फारसे व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी मानले जात नव्हते. पण सरफरोश प्रदर्शित झाला तेव्हा अनेकांनी त्याला डॉक्युमेंटरीसारखा चित्रपट म्हणत नाकारलं होतं. सोनालीने पुढे सांगितलं की 'सरफरोश' यशस्वी झाल्यानंतरही तिला अपेक्षित लोकप्रियता मिळाली नाही. ती म्हणाली, चित्रपट हिट झाल्यावर सगळ्यांनाच आश्चर्य वाटलं होतं. मला आठवतं, त्या वेळी आलेल्या रिव्ह्यूमध्ये मला चित्रपटातील कॉमिक रिलिफ म्हटलं गेलं. म्हणजे मी मुख्य अभिनेत्री नव्हतेच. मला वाटलं होतं की आता तरी माझा चित्रपट हिट ठरला आहे आणि कदाचित मला पुरस्कारांसाठी नामांकन मिळेल. पण मला सांगण्यात आलं की हा तुझा चित्रपट नव्हता, तू फक्त हलकं-फुलकं पात्र साकारलं होतं. त्यामुळे मला त्या चित्रपटासाठी कोणतंही नामांकन मिळालंच नाही. चित्रपटसृष्टीतील सुरुवातीच्या दिवसांच्या आठवणी सांगताना तिने सांगितलं की ती योगायोगानेच चित्रपटांमध्ये आली. कॉलेजम धील एका फॅशन शोमध्ये सहभागी झाल्यानंतर तिला ही संधी मिळाली. त्या वेळी एका स्पर्धक मुलीला दुखापत झाल्यामुळे सोनालीला त्या शोमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली होती. सोनाली म्हणाली, तेव्हापासून मी या क्षेत्राकडे वेगळ्या नजरेने पाहायला लागले. हे क्षेत्र नेमकं काय आहे? इथे इतके पैसे कसे मिळतात? इतके पैसे मिळू शकतात, याची मला आधी कल्पनाच नव्हती. सोनालीने पुढे एका सामान्य मराठी कुटुंबातून असून अभिनय क्षेत्रात काम करण्याचा तिने कधी विचारही केला नसल्याचं म्हटलं आहे. ती म्हणाली, आमच्या घरात इंजिनिअर, डॉक्टर, आयएएस अधिकारी असे लोक होते. चित्रपट पाहणं खूप कमी होतं आणि फिल्म मॅगझिन्स तर आमच्या घरी कधीच येत नव्हती.

# नात्यातील फसवणूकीवर रकुल बोलली...

बॉलिवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंग काही दिवसांपासून मोठ्या चर्चेत होती. रकुल व जॅकीने काही दिवसांपूर्वी एक मुलाखत दिली होती. त्यावेळी सिच्युएशनशिपबद्दल बोलताना जॅकी भगनानीने त्याचे व रकुलचे नातेदेखील तसेच आहे, असे म्हटले होते. त्याच्या या वक्तव्याची चांगलीच चर्चा झाली होती. आता रकुलने एका मुलाखतीत नात्यात फसवणूक करणे योग्य आहे का, याबद्दल वक्तव्य केले आहे. रकुल सध्या तिच्या पती पत्नी और वो दो या सिनेमामुळे चर्चेत आहे. या सिनेमात तिच्याबरोबर सारा अली खान, आयुष्मान खुराना, वामिका गब्बी हे कलाकार प्रमुख भूमिकात आहेत. या कलाकारांनी नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांना विचारले की, नात्यात चीटिंग करणे योग्य आहे का? यावर रकुल नाही, असे म्हणाली. या प्रश्नाचे उत्तर देत सारा अली खान म्हणाली, कमीत कमी समोरच्यानं माफी तरी मागायला हवी. पण,फसवणूक करणं, चुकीचं आहे. तर आयुष्मान खुराना म्हणाला, लग्नाचं स्वतःचे काही नियम असतात; पण जर एखाद्यानं मनापासून माफी मागितली असेल, तर त्याला एक संधी द्यायला हरकत नाही. आयुष्मानच्या या वक्तव्यावर रकुल म्हणाली, फसवणूक केल्यानंतर संधी देणं योग्य आहे, रकुलच्या प्रश्नाचं उत्तर देत अभिनेता म्हणाला, माणसं चुका करतात. काही वेळा ती चूक खरोखरच अनवधानाने होऊ शकते. त्यावर रकुल म्हणाली की, जर फसवणूक करणं ही व्यक्तीची सवय बनली असेल, तर त्याला माफ केलं जाऊ शकत नाही. आयुष्मान व रकुलच्या वक्तव्यावर सारानं विचारलं की, म्हणजे फसवणूक करणं योग्य आहे? त्यावर रकुल म्हणाली, नाही, मी असं म्हणत नाही. चीटिंग करणं योग्य नाही. आयुष्य खूप मोठं असतं आणि एखाद्याकडून एखादी चूक होऊ शकते. त्या एका चुकीसाठी आयुष्यभर शिक्षा देणं, माफ न करणं चुकीचं आहे. पुढे ती असेही म्हणाली की, हे माझ्या वैयक्तिक नात्यावर लागू होत नाही. रकुलच्या मतावर सहमती दर्शवीत आयुष्मान म्हणाला की, फसवणूक करणं चुकीचं आहे. माणसं चुका करतात. पण, त्या व्यक्तीला पश्चात्ताप होत असेल आणि त्या व्यक्तीबद्दल मनात भावना असतील, तर माफ करायला हरकत नाही. दरम्यान, रकुलची भूमिका असलेला पती पत्नी और वो २ हा सिनेमा किती कमाई करणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.





# रिया चक्रवर्तीनं सोशल मीडियाला ठोकला रामराम

बॉलीवूड गेल्या काही वर्षांत अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूनंतर प्रचंड ट्रोलिंग आणि मानसिक त्रासाचा सामना करणारी अभिनेत्री रिया चक्रवर्ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. रियाने आता काही काळासाठी सोशल मीडियापासून पूर्णपणे दूर राहण्याचा  एक मोठा निर्णय घेतला आहे. रिया चक्रवर्तीने तिच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर एक अत्यंत भावूक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून तिने सध्या तिच्या आयुष्यात सुरू असलेल्या मानसिक उलथापालथीचा अप्रत्यक्षपणे उल्लेख केला. रियाने लिहिले आहे की, नकारात्मकता आणि गोंधळाच्या वातावरणात मला असं वाटू लागलं आहे की, मी स्वत:शीच असलेला संपर्क गमावला आहे. मला आता काही काळ स्वत:साठी आणि एकांतात घालवायचा आहे. ही पोस्ट शेअर करत तिने तूर्तास सोशल मीडियावरून विश्रांती घेत असल्याचं जाहीर केलं. सुशांतच्या दुर्दैवी निधनानंतर रिया चक्रवर्तीच्या आयुष्याला पूर्णपणे वेगळे वळण लागले. तिच्यावर प्रचंड टीका झाली, ट्रोलिंग झाले. तिच्यावरच सुशांतला ड्रग देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे आरोप झाले होते. अनेक वर्ष रिया एनसीबीच्या चौकशी फेऱ्यात होती. यादरम्यान तिला काही काळ तुरुंगवासही भोगावा लागला होता. क्लीनचीट मिळाल्यानंतर तिनं बॉलिवूडमध्ये कमबॅक केलं. आता रियानं सोशल मीडियावरुन ब्रेक घेत असल्याने तिचे चाहते मात्र नाराज झाले आहेत.

# 'बाबूराव' 'हेरा फेरी ३'मधून बाहेर?

बॉलिवूडमधील लोकप्रिय कॉमेडी फ्रँचायझी 'हेरा फेरी ३'ची प्रेक्षक जितकी आतुरतेने वाट पाहत आहेत, तितकाच हा चित्रपट वादांच्या भोवऱ्यात अडकताना दिसत आहे. राजू, श्याम आणि बाबूराव या त्रिकुटाला पुन्हा पडद्यावर पाहण्याची चाहत्यांची इच्छा काही पुर्ण होणार नसल्याचं दिसत आहे. 'बाबूराव' म्हणजेच ज्येष्ठ अभिनेते परेश रावल यांनी या चित्रपटातून पुन्हा एकदा माघार घेतली असून, आपले मानधन व्याजासहित निर्मात्यांना परत केले आहे. परेश रावल यांनी चित्रपटाचे शुटिंग सुरू होण्यापूर्वीच या प्रोजेक्टमधून काढता पाय घेतला. यामागचे मुख्य कारण चित्रपटाचे मानधन आणि ते देण्याची पद्धत असल्याचे म्हटले जात आहे. परेश रावल यांना या चित्रपटासाठी तब्बल १५ कोटी रुपये मानधन मिळणार होते. सायनिंग अमाऊंट म्हणून सुरुवातीला ११ लाख रुपये देण्यात आले होते. मात्र, उर्वरित १४.८९ कोटी रुपये चित्रपट



प्रदर्शित झाल्यानंतर बरोबर एका महिन्याने देण्याचे वचन निर्मात्यांनी दिले होते. या अटीमुळे परेश रावल प्रचंड नाराज होते. चित्रपटाचे चित्रीकरण २०२६ च्या अखेरीस सुरू होऊन तो २०२७ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. म्हणजेच, उर्वरित १४.८९ कोटी रुपयांसाठी परेश रावल यांना दोन वर्षे वाट पाहावी लागली असती. इतका मोठा काळ थांबणे मान्य नसल्याने त्यांनी चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतला. एवढेच नव्हे तर, मिळालेले ११ लाख रुपये त्यांनी १५ टक्के व्याज आणि नुकसान भरपाईसह निर्मात्यांना परत केले आहेत. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

# जान्हवीने दिला वजन कमी करण्यासाठी सल्ला

बॉलिवूडमधील वजन वाढणे किंवा वजन कमी होणे या समस्यांचा अनेकांना सामना करावा लागतो. बदलती जीवनशैली आणि आरोग्याच्या विविध समस्या यांमुळे अनेकांचे वजन वाढते, तर काहींचे कमी होते. अनेकांना सततचे बैठे काम, अयोग्य आहार, अपूर्ण झोप आणि अशा अनेक गोष्टींमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. वजन कमी करण्यासाठी आहारात आणि जीवनशैलीत बरेच बदल करावे लागतात. यासाठी तज्ज्ञांची मदत घेणे महत्त्वाचे असते. अनेकदा कलाकारही त्यांच्या जीवनशैलीबद्दल मुलाखतींमधून व्यक्त होतात. त्यांच्या आहारात कोणते पदार्थ असतात, ते कोणते व्यायाम करतात, किती तासांची झोप घेतात, साखर किती प्रमाणात खातात या आणि अशा अनेक गोष्टी ते शेअर करतात. अनेक कलाकार सोशल मीडियावर सक्रिय आहेत. त्यांच्या सोशल मीडियावरील अकाउंटवरून ते विविध व्हिडीओ शेअर करत असतात. चाहत्यांच्या विविध प्रश्नांना ते उत्तरे देतात. त्यांच्या स्कीन केअर रुटिनबद्दलही सांगतात. आता अभिनेत्री जान्हवी कपूरने एका मुलाखतीत तिने वजन कमी कसे केले, याबद्दल वक्तव्य केले. मीडियाशी बोलताना ती म्हणाली, मी तुम्हाला वजन कमी करण्याची सर्वात चांगली टीप देईन. तुम्ही राम चरण सरांबरोबर डान्स करा, अर्ध्या दिवसात बारीक दिसाल, तुमचे वजन कमी होईल. जान्हवी लवकरच पेड्डी या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमात तिच्याबरोबर राम चरण प्रमुख भूमिकेत आहे. त्याच्याबरोबर काम करण्याचा अनुभव सांगताना त्याने हे वक्तव्य केले. तसेच त्याच्याबरोबर डान्स करताना तुमचे वजन कमी होईल इतकी ते मेहनत करतात, अशा आशयाचे वक्तव्यही केले. फिटनेस आणि पिलाटेस एक्स्पर्ट म्हणून काम करणार्या डॉ. वजल्ला श्रावणी डान्स करून वजन घटवण्याबद्दल म्हणाल्या की, वेगात डान्स केला तर काही तासात सरासरी व्यक्तीच्या ३५० ते ६०० कॅलरी बर्न होऊ शकतात. हे त्या व्यक्तीचे वजन, डान्सची तीव्रता आणि स्टेप्स किती सातत्याने केल्या जातात यावर अवलंबून असते. त्या पुढे म्हणाल्या की, डान्समध्ये सतत पायांची हालचाल आणि शरीराच्या वरच्या भागाचा वापर होत असल्यामुळे संपूर्ण वेळ हृदयाचे ठोके वाढलेले राहतात, त्यामुळे अनेक कार्डिओ वर्कआउट्सप्रमाणेच कॅलरी बर्न होतात. कोणताही व्यायाम करण्यापूर्वी किंवा वजन कमी करण्यासाठी विविध पद्धती अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. जान्हवीच्या आगामी सिनेमाबद्दल बोलायचे तर हा सिनेमा ४ जून २०२६ ला प्रदर्शित होणार आहे.

